MHLC260003192022

अर्ज (पी.जी.ए)क्र.४०/२०२२

निशाणी क्र. यु-०६

शपथेवर उलटतपास गैरअर्जदारातर्फे विधिज्ञ श्री. आर.एल. शुरकांबळे

१. मी प्रतिवादीकडे काम करत असताना मला नेमणूकीचे पत्र देण्यात आले होते. मी प्रतिवादीकडे काम मिळण्याकरीता अर्ज केला नव्हता. मी नेमणूकीचे पत्र या प्रकरणात दाखल केले आहे. दिनांक ०१/०४/१९८९ रोजी माझी नेमणूक झाली. मला वन परिक्षेत्र कार्यालयाने नेमणूक दिली. वन विभागीय अधिकारी यांना नेमणूकीचे अधिकार असून ते वन परिक्षेत्र अधिकारी यांना नाहीत, याबाबत मला माहिती नाही. सन १९८९ साली मला रोजगार मिळत होता. मी ज्या दिवशी काम करत असे त्या दिवसाचा मला पगार मिळत असे.

२. मी अर्जासोबत दाखल केलेली सेवा जेष्ठता यादी पाहिलेली आहे. सदर यादी विभागीय वन अधिकारी यांनी तयार केलेली आहे. सदरची यादी केंव्हा तयार करण्यात आली ती तारीख मला सांगता येत नाही. सदर यादीमध्ये मी वार्षिक २४० दिवस काम केले बाबत उल्लेख आहे. साक्षीदार पुन्हा सांगतो यादीमध्ये तशी नोंद नाही ती कार्यालयात आहे. वर्षामध्ये माझे २४० दिवस पूर्ण झाले याबाबत माहिती मिळावी याकरीता मी प्रतिवादीकडे अर्ज दिला नाही.

३. सन २०१२ मध्ये शासनाने असे परिपत्रक काढले की, ज्या मजूरांचे वार्षिक २४० दिवस सलग न भरता तुटक तुटक भरले असले तरी त्याना कायम कामगाराचा दर्जा देण्यात यावा. मी सुरुवातीला रोजगार हमी योजनेवर कामास होतो, हे म्हणणे बरोबर नाही. सन २०१२ ते सेवानिवृत्ती पर्यत मला कायम करुन पूर्ण पगार देण्यात आला आहे. आमचे कडून रु.१००/- च्या बॉन्डवर शपथपत्र प्रतिवादी कार्यालयाने लिहून घेतले, हे म्हणणे बरोबर नाही.

४. मी काम करण्यास पात्र आहे याबाबत जिल्हा शल्य चिकिस्तक यांच्याकडून वैद्यकीय दाखला आणावा असे मला प्रतिवादी कार्यालयाने सांगितले. मी सदरचा दाखला प्रतिवादीकडे दिला आहे. मी कामावर कायम झाल्यावर दाखला दिला. मी शपथपत्रात

आधीची कोणतीही आर्थिक मागणी करणार नाही असे लिहून दिले, हे म्हणणे बरोबर नाही. मला फक्त सेवेत कायम झाल्यापासून मला फक्त ०९ वर्षाचे उपदान निधी मागता येते, हे म्हणणे बरोबर नाही. प्रतिवादी कार्यालय मला काहीही देणे लागत नाही, हे म्हणणे बरोबर नाही. मी नेमणूकीची तारीख व पगाराबाबतची माहिती चुकीची दिली, हे म्हणणे बरोबर नाही. मी प्रतिवादी कार्यालयास त्रास देण्याकरीता खोटा अर्ज दिला आहे, हे म्हणणे बरोबर नाही.

५. न्यायालयात प्रकरण दाखल करण्यापूर्वी प्रतिवादीकडे अर्ज दाखल करावा लागतो याबाबत मला माहिती नाही. मी प्रतिवादी कार्यालयाकडे कधीही उपदान निधीची मागणी केलेली नाही, हे म्हणणे बरोबर नाही. मी देगलूर व नांदेड कार्यालयात कधीही अर्ज केलेला नाही तथा उपदानाची रक्कम मागणी केलेली नाही, हे म्हणणे बरोबर नाही. मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे बरोबर नाही.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

सदरचा जवाब वाचला व मान्य केला

दिनांक – १३/१२/२०२३
ठिकाण – नांदेड

नियंत्रण अधिकारी, पी.जी.ॲक्ट
तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय, नांदेड